दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १९३ वा शुक्रवार दि.२९ डिसेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# देशात राजकीय नव्हे विचारधारेची लढाई

नागपूर : प्रतिनिधी–भाजप देशाला गुलामगिरीकडे घेऊन जात आहे. कोणाचेच ऐकायचे नाही, हा पंतप्रधान मोदींची स्वभाव आहे. त्यामुळे वरून आदेश दिले जातात आणि बाकीच्यांना ते ऐकावे लागतात. मात्र, काँग्रेसमध्ये सर्वांना बोलण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य आहे. देशाचे नेतृत्त्व सर्वसामान्य लोकांच्या हाती असायला हवे, ही आमची विचारधारा आहे. त्यामुळे देशात दोन विचारधारांमध्ये लढा सुरू आहे, असे सांगत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भाजप, रा. स्व. संघावर जोरदार हल्लाबोल केला. काँग्रेसच्या वर्धापन दिनाने औचित्य साधून काँग्रेस पक्षाने नागपुरात शक्तिप्रदर्शन करतानाच आगामी लोकसभा निवडणुकीचे रणशिंगही फुंकले.

नागपुरात आज काँग्रेसचा १३९ व्या स्थापनादिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, तैयार है हम या टॅगलाईनखाली घेण्यात आलेल्या कार्यक्रमाला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. नरेंद्र मोदी हे स्वत:ला ओबीसी असल्याचे म्हणाले होते. त्यांचे सरकार हे ओबीसी असल्याचे ते म्हणाले होते. मग त्यांना आम्ही विचारले की, त्यांच्या सरकारमध्ये किती ओबीसी लोक आहेत, त्यांच्या सरकारमध्ये किती अधिकारी ओबीसी आहेत? त्यानंतर ते म्हणाले की, देशात फक्त एकच जात आहे आणि ती म्हणजे गरिबी. मग असे असेल तर तुम्ही स्वत:ला ओबीसी कसे काय म्हणता, असा सवालही राहुल गांधी यांनी उपस्थित केला. यावेळी त्यांनी आम्ही दिल्लीत सत्तेत आलो तर देशात जातीय जनगणना केली जाईल, असे आश्वासन दिले.

देश फक्त ९० लोक चालवतात. त्यामध्ये आयएएस अधिकारी आहेत, ते संपूर्ण बजेटचे नियोजन करतात. मी त्यावर विचारले की, या ९० लोकांमध्ये किती अधिकारी हे ओबीसी आणि दलित आहेत. त्यामधील फक्त ३ अधिकारी ओबीसी असल्याचे समोर आले आहे. मग हे कसले ओबीसींचे सरकार? असा सवाल राहुल गांधी यांनी उपस्थित केला. स्वातंत्र्यापूर्वी भारतात ब्रिटिशांचे राज्य आणि राजेशाही होती, त्यावेळी राजा म्हणेल ते खरे अशी स्थिती होती. आताही तीच परिस्थिती आहे. कुणाचेच ऐकून घ्यायचे नाही, हा नरेंद्र मोदी यांचा स्वभाव आहे, अशी टीका काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली. पूर्वी दलितांना स्पर्श केला जायचा नाही, ही आरएसएसची विचारधारा आहे, आता देश त्याच मार्गावरून नेला जात असल्याचेही ते म्हणाले.

स्वातंत्र्यापूर्वी या देशात पाचशे–सहाशे राजे, इंग्रज होते. त्यावेळी सामान्य जनता भरडली जात होती. त्यावेळी उद्भवलेल्या संघर्षात अनेकांना तुरुंगवास भोगावा लागला. स्वातंत्र्यानंतर काँग्रेसने सर्वांना समान मानले आणि प्रत्येकाला एका मताचा अधिकार दिला. सर्वसामान्य असो वा दलित, आदिवासी असो किंवा राजा असो, सर्वांनाच काँग्रेसने एका मताचा अधिकार दिला आणि सर्वांना समान पातळीवर आणले, असे राहुल गांधी म्हणाले. यावेळी त्यांनी नरेंद्र मोदी सरकारने सुरू केलेल्या अग्नीवीर योजनेवर राहुल गांधी यांनी टीका केली. या योजनेच्या माध्यमातून भाजपने तरुणांची चेष्टा चालवली असल्याची टीका राहुल गांधी यांनी केली.

**भाजपचा देशाला गुलाम काळात नेण्याचा प्रयत्न**

देशात सध्या दोन विचारसरणींचा संघर्ष सुरू आहे. भाजप देशाला स्वातंत्र्यपूर्व काळात, गुलामीच्या काळात नेण्याचा प्रयत्न करीत आहे, अशा शब्दांत काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधींनी सत्ताधा–यांवर तोफ डागली. काही दिवसांपूर्वी लोकसभेत मला भाजपचा एक खासदार भेटला. आता आम्हाला इथे सहन होत नाही. कारण आमचे कुणी ऐकतच नाही, असे त्यांनी म्हटले. भाजपची विचारसरणी राजांसारखी आहे. वरून आदेश येतो. त्याचे पालन केले जाते. काँग्रेसमध्ये सगळ्यांना बोलण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य आहे, असे राहुल गांधी म्हणाले.

**गरीब जनतेसाठी काँग्रेसने संघर्ष केला**

काँग्रेसने गरीब जनतेसाठी संघर्ष केला. हिंदुस्तानातील जनतेला कोणतेच अधिकार नव्हते. महिलांना कोणतेही हक्क नव्हते. हीच संघाची विचारसरणी आहे. आता हे लोक देशाला पुन्हा त्याच काळात घेऊन जाण्याचा प्रयत्न करत आहेत, अशी टीका राहुल गांधींनी केली.

## एसटी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ पाटील यांची हकालपट्टी

मुंबई : एसटी बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकांना सहकार आयुक्तांनी जोरदार दणका दिला आहे. एकही पात्रता निकष पूर्ण न करता आल्यामुळे पदावरून हटवण्यात आले आहे. एसटी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ पाटील हे गुणरत्न सदावर्ते यांचे जवळचे नातेवाईक आहेत. आरबीआयची पूर्वपरवानगी न घेताच पदावर बसवल्यानंतर सहकार खात्याने नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर आता थेट कारवाई करण्यात आली आहे.

एसटी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ पाटील यांच्याकडून पात्रता निकषाची पूर्तता होत नसल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे. एसटी बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकांना किमान आठ वर्षांचा अनुभव हवा असतो. त्याशिवाय ३५ वर्षे वयाची अट आहे. पण सौरभ पाटील यांचे वय २५ वर्षांच्या आसपास आहे. त्याशिवाय त्यांच्याकडे आठ वर्षांचा अनुभवही नाही. त्याशिवाय आरबीआयची परवानगी घेणेही बंधनकारक असते. पण सौरभ पाटील कोणत्याच निकषात बसत नव्हते. त्यामुळे अखेर सहकार आयुक्तांनी त्यांच्यावर कारवाई केली. दरम्यान, एसटी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून सौरभ पाटील हे कोणत्याही निकषात बसत नव्हते, त्यामुळे सहकार आयुक्तांनी पत्र लिहून नाराजी व्यक्त केली होती. मागील तीन ते चार महिन्यांत या प्रकरणाबाबत मोठ्या घडामोडी घडल्या आहेत.सौरभ पाटील यांच्यावर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. हा गुणरत्न सदावर्ते यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे. गुणरत्त सदावर्ते यांचे पॅनेल एसटी बँकेवर सत्तेत आहेत. त्यांचे नातेवाईक सौरभ पाटील हे संचालक झाले होते. पण ते कोणत्याही निकषात बसत नव्हते. याआधी सहकार आयुक्तांनी पत्र लिहून याबाबत नाराजी व्यक्त केली होती. आता सौरभ पाटील यांना काढून टाकण्याचे निर्देश दिले आहेत.

## भाजयुमोचे ऋषिकेश कराड यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव



लातूर दि.२८ :- लातूर ग्रामीण मधील भाजपाचे युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांची भारतीय जनता युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी नुकतीच नियुक्ती झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत असून अनेकांनी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात गेल्या काही दिवसापासून भाजपाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेऊन कार्यरत असणारे युवा नेते ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांचा युवकासोबत मोठा जनसंपर्क आहे. संघटन कौशल्य, कर्तुत्व आणि वकृत्व असल्याने सामाजिक, राजकीय, धार्मीक व इतर कार्यातून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. भारतीय जनता पार्टीत आजपर्यंत केलेल्या कामाची दखल घेऊन भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांनी ऋषिकेश कराड यांच्यावर भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश सचिव पदाची जबाबदारी दिली आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील तरुणांसोबत काम करणारे त्यांच्या सुखदुखात सहभागी होणारे युवा नेते ऋषिकेश कराड यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश सचिव पदी नियुक्ती झाल्याने तरुणांत मोठा उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ऋषिकेश कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीणसह जिल्हाभरातील भाजयुमोच्या पक्ष कार्याला निश्चितपणे बळकटी मिळेल असा अनेकांनी विश्वास व्यक्त केला असून या निवडीबद्दल ऋषिकेश कराड यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेकांनी प्रत्यक्ष भेटून तर काहींनी दुरध्वनीवरुन अभिनंदन केले आहे.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या प्रदेश सचिवपदी निवड झाल्याने भाजपाचे विक्रमकाका शिंदे, भागवत सोट, अमोल निडवदे, महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, अँड. दशरथ सरवदे, बन्सी भिसे, अभिषेक आकनगिरे, सतीश आंबेकर, हनुमंतबापू नागटिळक, सुरज शिंदे, साहेबराव मुळे, अनंत चव्हाण, पद्माकर चिंचोलकर, वसंत करमुडे, वैभव सापसोड, भैरवनाथ पिसाळ, सुधाकर गवळी, चंद्रकांत कातळे, गोविंद नरहरे, शाम वाघमारे, संभाजी वायाळ, प्रताप पाटील, गंगासिंह कदम, ललिता कांबळे, शिला आचार्य, सुरेखा पुरी, लता भोसले, पांडूरंग बालवाड, श्रीकृष्ण मोटेगावकर, दिपक वांगसकर, आदीनाथ मुळे, गोपाळ पाटील, अशोक सावंत, राजकिरण साठे, सुकेश भंडारे, अमर चव्हाण, संजय ठाकूर, शरद दरेकर, अनंत कणसे, ज्ञानोबा भिसे, श्रीकृष्ण पवार, नरसिंग येलगटे, अच्युत कातळे, रवी माकुडे, दत्ता सरवदे, गणेश तूरुप, मारुती शिंदे, लक्ष्मण नागिमे, गोपाळ शेंडगे, रमाकांत फुलारी, उत्तम चव्हाण, राजू आलापुरे अच्युत भोसले, श्रीकृष्ण जाधव, विजय चव्हाण, अक्षय भोसले, माधव घुले, रमेश कटके, गणेश माळेगावकर, जलील शेख, प्रशांत शिंदे, रमेश चव्हाण, अच्युत भोसले, शुभम खोसे, कार्तीक गंभिरे, वैजनाथ हराळे, राम बंडापल्ले, समाधान कदम, सुखदेव बरडे, ईश्वर बुलबूले, ज्ञानेश्वर जूगल, रमेश लहाडे, सचिन लटपटे, किशोर घुटे, अल्ताफ शेख, हणमंत कापरे, नागराज रिंगणकर यांच्यासह अनेकांनी फेटा बांधून शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.




## संपादकीय....

# जनतेला विश्वासात घ्या

राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाविरुद्ध भोमवासीयांनी दंड थोपटले व सीमांकन करण्यास आलेल्या अधिकाऱ्यांना अटकाव करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सरपंचासह नागरिकांना ताब्यात घेण्याची वेळ पोलिसांवर आली. पणजी फोंडा दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्र. ७४८ चे काम गेली कित्येक वर्षे निव्वळ राजकारणापोटी अडलेले आहे. हाच नव्हे, तर राज्यातील इतर सर्व महामार्ग पूर्णत्वास आलेले असताना केवळ महामार्गाच्या ह्या भागाचे चौपदरीकरण अडून राहावे ही बाब पचनी पडणारी नाही. ह्या विलंबामुळे प्रकल्पाचा खर्चही कित्येक पटींनी वाढत चालला आहे. भोम येथे रस्ता रुंदीकरणासाठी जमीन संपादनाची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर नागरिकांनी त्याविरुद्ध दंड थोपटले होते. तेव्हा तत्कालीन सार्वजनिक बांधकाममंत्री नीलेश काब्राल यांनी ह्या रुंदीकरणासंदर्भात सविस्तर सादरीकरण केले होते आणि विरोधकांचे सर्व आक्षेप खोडून काढले होते. त्यामुळे आंदोलकांना पाठिंबा देण्यासाठी गेलेले गोवा फॉरवर्ड आणि आरजीच्या नेत्यांचीही बोलती बंद झाली होती. काब्राल आता साबांखा मंत्रिपदी नाहीत, परंतु सरकार तोच आराखडा घेऊन पुढे जात असेल तर त्याला असा विरोध का व्हावा? जनता विरोध करते ती प्रत्येक गोष्ट योग्यच असते असे नव्हे. नेतेगिरी करण्याचा काहींचा सोसही अनेकदा जनतेला चिथावणी देण्यास कारण ठरत असतो आणि त्यामागे राजकारण आणि काहींची राजकीय महत्त्वाकांक्षाही दडलेली असते. येथे भोमवासीयांचा विरोध हा खरोखरच प्रकल्पबाधीतांचा विरोध आहे असे जरी मानले तरी सरकारी अधिकाऱ्यांच्या सीमांकनाच्या कामास अशा प्रकारे दमदाटीने विरोध करणे उचित ठरत नाही. सरकारी सेवकांस रोखणे हा कायद्याने गुन्हा आहे हे भान आंदोलकांस हवेच. भोम येथील महानंदू हायस्कूल ते कुंडई येथील वैशाली रेसिडेन्सीपर्यंत एक मोठा अर्धगोलाकार वळसा घेऊन हा महामार्ग जात असल्याने शक्य असेल तर स्थानिक नागरिकांच्या जमिनी, घरे, मंदिर वाचवण्यासाठी एखादा बगलरस्ता करता येईल का पाहिले जावे अशी सूचना आम्ही ह्या विषयावरील अग्रलेखात यापूर्वी केली होती. स्थानिक नागरिकही काल बगलरस्त्याची मागणी करताना दिसले. अशा प्रकारचा बगलरस्ता शक्य असेल आणि त्यामुळे लोकांची घरे जाणार नसतील तर व्हायला हरकत नाही, परंतु एकदाचा ह्या रुंदीकरणाचा सोक्षमोक्ष लागला पाहिजे. शेवटी महामार्गाचे चौपदरीकरण हे जनतेच्या हिताचेच असल्याने तिला विश्वासात घेऊन ह्या चौपदरीकरणाचे महत्त्व पटवून देण्याची जबाबदारी स्थानिक लोकप्रतिनिधींची आहे. ते करण्याऐवजी मतांच्या हिशेबासाठी जनतेच्या सुरांत सूर मिसळणे गैर आहे. मुळात सरकार आणि जनता ह्यामध्ये संवाद हवा. राज्यातील अनेक प्रकल्पांना केवळ ह्या संवादाअभावी विरोध होतो आहे असे दिसते. पणजी फोंडा महामार्गाचे जुने गोवे ते फोंड्यादरम्यान चौपदरीकरण होणे अत्यावश्यक आहे ह्याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. तरीही ह्या भागाच्या चौपदरीकरणाचे काम एवढी वर्षे उलटली तरी का सुरू होऊ शकत नाही? न्यायालयीन अडथळ्यांतून राष्ट्रीय प्रकल्पांस बाधा आणली जात असेल तर सरकारने त्याबाबत खमकी भूमिका घेतली पाहिजे. जुन्या गोव्यातील दर्ग्यासमोरील एक बेकायदा बांधकाम रातोरात कसे उचलले गेले होते त्याचा दाखला समोर आहेच. केवळ मतांच्या हिशेबाखातर बोटचेपे धोरण स्वीकारले जाऊ नये. पणजीहून कदंब पठारावरून जाणाऱ्या चौपदरी रस्त्यामुळे वाहतूक सुलभ बनली. फोंड्याला जाताना पणजीहून ह्या बायपासने खोर्लीपर्यंत वेगाने पोहोचावे आणि नंतर मात्र खोर्लीपासून अडथळ्यांच्या शर्यतीत अडकावे असा सध्या प्रकार चालतो. खोर्ली येथे भररस्त्यात बसगाड्या उभा असतात. त्यामुळे दोन्ही बाजूंनी लांबच लांब रांगा लागतात हे दृश्य आता प्रवाशांच्या सवयीचे झाले आहे. परंतु त्यावर उपाय काढावा असे कोणाच्याही डोक्यात येत नाही. चौपदरीकरण झालेले नसल्याने ओल्ड गोवा ते फोंडा दरम्यान अनेक भीषण अपघात आजवर घडले आहेत व अनेकांचा त्यात जीव गेला आहे. भोम येथे सातेरी मंदिराजवळील रस्ता अरुंद तर आहेच, पण धोकादायकही आहे. त्यामुळे येथील मार्गाचे रुंदीकरण अत्यावश्यक आहे. भोम येथे महामार्ग रुंदीकरणात जाणारी अनेक बांधकामे ही पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा दावा साबांखामंत्र्यांनी केला होता. त्याची शहानिशाही होणे आवश्यक आहे. खोर्ली ते फोंडा ह्या दरम्यानच्या महामार्गाच्या चौपदरीकरणासंदर्भात हैदराबादच्या कंपनीने जो सविस्तर दोन टप्प्यांतील आराखडा बनवला आहे, त्यासंदर्भात सरकारने स्थानिक जनतेला विश्वासात घ्यावे आणि ह्या कामाला गती द्यावी. राष्ट्रीय प्रकल्पांना ऊठसूट विरोध करण्याची जी परंपरा गोव्यात निर्माण झालेली आहे, तिला केवळ मतांसाठी चालना देऊ नये.

# पायाभूत सुविधांची अर्थव्यवस्थेतील भूमिका काय? या सुविधांचे वर्गीकरण कसे केले जाते?

मागील लेखातून आपण पायाभूत सुविधा ही संकल्पना, पायाभूत सुविधेचे महत्त्व, या सुविधांची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भारतातील पायाभूत सुविधांची अधिकृत विचारधारा याबाबत माहिती घेतली. या लेखातून आपण पायाभूत सुविधांचे वर्गीकरण, पायाभूत सुविधांची अर्थव्यवस्थेमधील भूमिका तसेच भारतातील पायाभूत सुविधा विकासातील उणिवा इत्यादींबाबत जाणून घेऊया.



पायाभूत सुविधांचे वर्गीकरण :

एखाद्या देशांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विकासासाठी जे आवश्यक मूलभूत घटक जबाबदार असतात, त्यांचा समावेश हा पायाभूत क्षेत्रामध्ये करण्यात येतो. पायाभूत सुविधांचे वर्गीकरण हे मुख्यतः दोन गटांमध्ये करता येऊ शकते. यामध्ये पहिला गट म्हणजे आर्थिक पायाभूत सुविधा व दुसरा गट म्हणजे सामाजिक पायाभूत सुविधा.

आर्थिक पायाभूत सुविधा :

साधारणतः आर्थिक पायाभूत सुविधा या उत्पादन व वितरणाशी संबंधित सुविधा असतात. आर्थिक सुविधांमध्ये संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित सुविधांचा समावेश होतो. यामध्ये कृषी उत्पादन, उद्योग उत्पादन व वितरणाशी संबंधित सेवा व सुविधा यांना आर्थिक पायाभूत सुविधा असे म्हटले जाते. या सुविधांमध्ये वाहतूक सुविधा म्हणजेच रस्ते, लोहमार्ग, जलमार्ग, वायू मार्ग, वित्तीय सुविधा तसेच ऊर्जा व दळणवळण सुविधा यामध्ये पोस्ट, टेलिफोन, रेडिओ, टीव्ही, इंटरनेट इत्यादी सेवांचा समावेश आर्थिक पायाभूत सुविधांमध्ये होतो. आर्थिक पायाभूत सुविधा या अर्थव्यवस्थेला गतिमान करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात. या सुविधा अर्थव्यवस्थेला आतून आणि थेट गतिमान करतात. तसेच या पायाभूत सुविधांच्या विकासामुळे आर्थिक स्त्रोतांचा विकासदेखील होतो.

सामाजिक पायाभूत सुविधा :

आपण आर्थिक पायाभूत सुविधा बघितल्या, या सुविधा उत्पादन व वितरणाशी थेट संबंधित असतात. मात्र, सामाजिक पायाभूत सुविधा या उत्पादन व वितरण यंत्रणेला बाहेरून योगदान देणाऱ्या सेवा व सुविधा यांना सामाजिक पायाभूत सुविधा असे म्हटले जाते. या सुविधा संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित नसून मुख्यतः या व्यक्तीशी संबंधित असतात. सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये दळणवळण; यामध्ये पोस्ट, टेलिफोन, रेडिओ, टीव्ही, इंटरनेट तसेच मूलभूत सुविधांचा म्हणजेच अन्न, पाणी, निवारा, इंधन, शिक्षण, आरोग्य अशा सेवा-सुविधांचा समावेश यामध्ये होतो. येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे गरजेचे आहे, ती म्हणजे दळणवळण सुविधा ही आर्थिक तसेच सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या पायाभूत सुविधांमध्ये गणल्या जातात. सामाजिक पायाभूत सुविधा या अर्थव्यवस्थेला थेट गतिमान न करता बाहेरून आणि अप्रत्यक्ष गतिमान करतात. सामाजिक सुविधांमुळे आर्थिक स्त्रोतांचा विकास न होता मानवी स्त्रोतांचा विकास होतो.

पायाभूत सुविधांची अर्थव्यवस्थेकरिता गरज आणि त्यांचे महत्त्व :आपण आधीच्या लेखामध्येदेखील बघितले आहे की, पायाभूत सुविधांना अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. आता आपण प्रत्यक्षात अर्थव्यवस्थेमध्ये या सुविधांचा कसा परिणाम होतो हे बघण्याचा प्रयत्न करूया.

कृषी विकास : कृषी क्षेत्राचा विकास होण्याकरिता पायाभूत सुविधांचा विकास होणे गरजेचे आहे. कारण रस्त्यांमुळे शेती, गाव आणि शहरे हे एकमेकांना जोडले जातात. सामान्यतः कृषी माल हा शेतीमधून गावागावातून शहर असा प्रवास करण्याकरिता योग्य पायाभूत सुविधा असणे अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची मागणी पूर्ण करण्याकरिता तसेच उत्पादित कृषी माल हा पोहोचवण्यासाठी बाजारपेठेशी संलग्न राहण्याकरिता तसेच वित्त सेवा, साठवणूक, पणन अशा प्रत्येक ठिकाणीच वाहतुकीची अत्यंत गरज लागते. तसेच काही नाशवंत कृषी माल म्हणजे फुले, फळे अशा वस्तूंच्या निर्यातीकरिता जलद वाहतूक सेवेची गरज असते. त्याकरिता कृषी क्षेत्राचा विकास घडून यायचा असेल तर पायाभूत सुविधा या महत्त्वाची भूमिका बजावतात.

उद्योग क्षेत्र विकास : उद्योग क्षेत्रामध्ये तर पायाभूत सुविधांचा विकास होणे ही अत्यंत गरजेची बाब आहे. उद्योगासाठी दळणवळण तसेच वाहतुकीची साधने या अत्यावश्यक बाबी असतात. तसेच ऊर्जा साधनांचीदेखील या उद्योगांना मोठ्या प्रमाणामध्ये गरज असते. या पायाभूत सुविधांचा योग्य तो विकास झाला तरच उद्योग क्षेत्राच्या विकासाला गती प्राप्त होते.

सामाजिक जीवनामध्ये पायाभूत सुविधांची भूमिका : आपण वर सामाजिक पायाभूत सुविधांबद्दल बघितले आहे. यामध्ये शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, निवारा, पाणीपुरवठा, इंधन अशा दैनंदिन मानवी जीवनाच्या अत्यावश्यक गरजा आहेत. या सर्व पायाभूत सुविधांचा विकास म्हणजेच मानव विकास साधने होय. भौतिक विकासाबरोबरच सामाजिक विकास होणे हेसुद्धा तेवढेच महत्त्वाचे असते.

विकसित पायाभूत सुविधांमुळे गाव, शहर व राज्य अशी सर्व जवळ येतात. यामधून विचारांचे तीव्र गतीने आदान- प्रदान होते. तसेच याद्वारे संशोधनास चालना मिळते व आर्थिक प्रगतीस हातभार लागतो. तसेच विविध माहितीच्या प्रसारामधून आचार -विचार, संस्कृतीचेदेखील आदान-प्रदान होते. अशा सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधांचा विकास होणे अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

भारतातील पायाभूत सुविधा विकासातील उणिवा :

भारतातील नियोजन काळादरम्यान पायाभूत सुविधांच्या विकासाचा दर हा अल्प प्रमाणातच राहिला आहे. पायाभूत सुविधांकरिता आवश्यक असणारे मोठे भांडवल उभारणे शक्य झाले नाही. १९९१ पर्यंत सर्व पायाभूत प्रकल्प हे सार्वजनिक गुंतवणुकीद्वारेच उभे करण्यात आले आहेत. १९९१ नंतर मात्र यामध्ये बदल करून पायाभूत प्रकल्प हे सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारा हाताळले जात असले तरी अर्थव्यवस्थेचे वाढते आकारमान बघता भांडवलाची तीव्र कमतरता भासते. साधारणतः पायाभूत सुविधांचा विकास हा शहरी भागात जास्त प्रमाणात झालेला पहावयास मिळतो. यापासून खेडी ही दुर्लक्षितच राहिली आहे. यामुळे या पायाभूत सुविधांचा जास्त फायदा हा शहरी वर्गालाच झालेला आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये रस्ते विकासाला सुरुवात झाल्यानंतर हा दर थोडा बरा असला तरी नवीन रेल्वेमार्ग उभारणीचा वेग हा फारच मंद स्वरूपाचा राहिला आहे. तसेच अंतर्गत जलमार्गाचे महत्त्वसुद्धा उशिरा ध्यानात आले. त्याचबरोबर वीज उत्पादनाचे संकटसुद्धा कायम राहिलेले आहेच. अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या विकासाचा दरसुद्धा अल्प आहे. अशा प्रकारच्या अनेक उणिवा या पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये निदर्शनास येतात. आता मात्र पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष देण्यात येत आहे.

# भारतातील रस्त्यांचे भौगोलिक वितरण कसे करण्यात आले? रस्ते वितरणाशी संबंधित समस्या कोणत्या?

मागील लेखांतून आपण भारतातील रस्ते वाहतुकीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, रस्त्यांचे प्रकार, त्यांची राज्यातील घनता यांविषयी माहिती घेतली. या लेखातून आपण रस्ते वितरणावर परिणाम करणारे भौगोलिक घटक आणि रस्ते वितरणाशी संबंधित समस्यांविषयी जाणून घेऊ.

रस्त्यांचे भौगोलिक वितरण

रस्त्यांचे जाळे कमी-अधिक प्रमाणात रेल्वेसारखेच असले तरी रस्त्यांचे जाळे किलोमीटरच्या संदर्भात रेल्वेमार्गांच्या तुलनेत खूप जास्त आहे. भारतातील रस्त्यांच्या वितरण पद्धतीमध्ये मोठी तफावत असल्याचे दिसून येते. उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तमिळनाडू, महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, ओडिशा व बिहार या राज्यांमध्ये राष्ट्रीय महामार्गांची लांबी जास्त आहे. योगायोगाने ही लोकसंख्येची उच्च घनता आणि औद्योगिक वाढीचा तुलनेने प्रगत टप्पा असलेली मोठी राज्ये आहेत. तथापि, एखाद्या राज्यातून जाणार्या राष्ट्रीय महामार्गांची लांबी हा नेहमीच राज्याच्या आर्थिक कल्याणाचा खरा निर्देशांक नसतो. कारण- ते फक्त मुख्य मार्गांना सेवा देतात. उदाहरणार्थ- मध्य प्रदेश व बिहारमध्ये राष्ट्रीय महामार्गांची लांबी जास्त आहे आणि तरीही या राज्यांची इतर राज्यांत जसे महाराष्ट्र, गुजरात यांच्या तुलनेत कमी प्रगती झालेली आहे.

राज्य महामार्गांची लांबी ही राज्य स्तरावरील रस्त्यांच्या सुलभतेचा एक चांगला निर्देशांक असू शकतो. राष्ट्रीय महामार्गांच्या तुलनेत राज्य महामार्गांबाबत चित्र थोडे वेगळे आहे. राज्य महामार्गांद्वारे महाराष्ट्र हे सर्वोत्तम सेवा देणारे राज्य आहे. राज्य महामार्गांच्या लांबीच्या बाबतीत गुजरात दुसऱ्या क्रमांकावर आहे. मध्य प्रदेश, राजस्थान, कर्नाटक, उत्तर प्रदेश व आंध्र प्रदेश ही राज्य महामार्गांची पुरेशी लांबी असलेली इतर राज्ये आहेत. भारताच्या उत्तर-पूर्व/ईशान्य राज्यांमध्ये राज्य महामार्गांचा पुरेसा विकास झालेला नाही.

रस्त्यांचे स्वरूप, त्यांच्या एकूण लांबीपेक्षा उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून अधिक महत्त्वपूर्ण असतात. भारताच्या उत्तरेकडील मैदानात, विशेषतः पश्चिम बंगालमध्ये आणि पंजाब-हरियाणाच्या मैदानात रस्त्यांचे सर्वाधिक प्रमाण आढळते. परंतु, भारतातील रस्त्यांच्या लांबीचे एकूण प्रमाण राष्ट्रीय सरासरीपेक्षा उत्तरेकडील मैदानात कमी आहे. उदाहरणार्थ- बिहार व पश्चिम बंगाल ही मैदानी भाग असलेली दोन मोठी राज्ये आहेत. परंतु, त्यांच्याकडे एकूण रस्त्यांची लांबी अनुक्रमे ४२.३२ टक्के व ५६.४८ टक्के रस्ते आहेत. उत्तर प्रदेशात ६८.७४ टक्के रस्ते आहेत. पंजाब व हरियाणा ही देशातील दोन सर्वांत श्रीमंत राज्ये; जिथे ९४.८३ टक्के रस्ते आहेत.

उत्तरेकडील सपाट भागात रस्ते बांधण्यासाठी वाळू, गाळ, चिकणमाती व दगडांची कमतरता आहे. त्याउलट द्वीपकल्पीय पठार क्षेत्रावर रस्ते बांधण्यासाठी कठीण खडक आणि दगड सहज उपलब्ध आहेत. म्हणून द्वीपकल्पीय पठारावरील राज्यांमध्ये रस्त्यांचे प्रमाण भरपूर आहे. उदाहरणार्थ, गुजरात (९३.९५ %), महाराष्ट्र (७९.६८ %), गोवा (६१ %) ही राज्य रस्ते वाहतुकीच्या राष्ट्रीय सरासरीपेक्षा जास्त प्रमाण असलेली राज्ये आहेत.



हिमालयीन राज्यांपैकी सिक्कीममध्ये रस्त्यांचे प्रमाण ८६.११ टक्के असून हे राज्य शीर्षस्थानी आहे आणि त्यानंतर जम्मू आणि काश्मीरमध्ये ७०.९७ टक्के रस्त्याचे प्रमाण आहे. केंद्रशासित प्रदेशांपैकी चंदीगड, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव, दिल्ली आणि लक्षद्वीपमध्ये १०० टक्के रस्ते उपलब्ध आहेत. त्यापाठोपाठ अंदमान निकोबारमध्ये ९७.४७ टक्के आणि पुद्दुचेरीमध्ये ७७.०९ टक्के रस्त्यांची घनता आहे.

हिमालयीन प्रदेश, पश्चिम राजस्थान आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये रस्त्यांचे जाळे कमी ते अत्यंत कमी घनता आहे. यातील बहुतांश भाग बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनने बांधलेल्या रस्त्यांद्वारे पुरवले जातात. हे जम्मू आणि काश्मीरमध्ये १० किमी प्रति १०० चौरस किमी ते केरळमध्ये ५२६.९ किमी प्रति १०० चौरस किमी आहे.

आसाम, गोवा, त्रिपुरा आणि पश्चिम बंगालमध्ये २०० ते ४०० किमी प्रति १०० चौरस किमी घनता आढळते. आंध्र प्रदेश, बिहार, कर्नाटक, नागालँड, ओडिशा, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेशमध्ये रस्त्यांची घनता १०० ते २०० किमी प्रति १०० चौ.कि.मी. घनता आहे.

उत्तर भारतातील ग्रेट प्लेनची सपाट जमीन रस्ते बांधणीसाठी आदर्श परिस्थिती प्रदान करते. परंतु, रस्त्यासाठी बांधकाम साहित्य हिमालयाच्या डोंगराळ प्रदेशातून किंवा पठाराच्या उत्तरेकडील भागातून आणावे लागते. कारण- हा प्रदेश संपूर्णपणे वाळू, गाळ आणि चिकणमातीचा बनलेला आहे.

दुसरीकडे हिमालयीन प्रदेशात बांधकाम साहित्य भरपूर आहे; परंतु खडबडीत स्थलाकृती आणि खडबडीत भूभाग रस्तेबांधणीच्या प्रक्रियेत अडथळा आणतो. हेच कारण आहे की, जम्मू व काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम, मेघालय, मणिपूर इत्यादी हिमालयातील राज्यांमध्ये रस्त्यांची घनता कमी आहे. बहुतेक केंद्रशासित प्रदेश लहान आकाराचे आहेत आणि त्यापैकी काहींमध्ये मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेले आहे. म्हणून अंदमान आणि निकोबार बेटे वगळता त्यांच्याकडे रस्त्यांची घनता जास्त आहे.

रस्ते वाहतुकीच्या समस्या

भारतातील रस्ते वाहतुकीला अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. देशाच्या परिमाणांची विशालता, तिची लोकसंख्या, तिची अमर्याद नैसर्गिक संसाधने आणि वेगाने वाढणारी प्रवासी आणि मालवाहतूक लक्षात घेता, रस्त्यांचे जाळे अपुरे आहे. जपानमधील २९४.६ किमी, ऑस्ट्रियामध्ये १३१.२ किमी, बेल्जियममध्ये ४५१.८ किमी, फ्रान्समध्ये १४७.२ किमी व स्वित्झर्लंडमधील १७२.२ किमीच्या घनतेच्या तुलनेत भारताच्या रस्त्यांची लांबी ९६.५ किमी प्रति १०० चौरस किमी क्षेत्रफळ अत्यंत कमी आहे.

दुसरी समस्या अशी आहे की, अर्ध्याहून थोडे कमी रस्ते (४० टक्के) असुरक्षित आहेत. ते फक्त योग्य हवामानात वापरले जाऊ शकतात आणि पावसाळ्यात चिखलामुळे वाहतुकीसाठी अयोग्य होतात. व्यावहारिकदृष्ट्या शक्य तितके सपाट आणि पक्के रस्ते बांधण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. लोकसंख्या आणि साहित्याची वाढती रहदारी पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गांचे जाळे सुधारावे लागेल. रस्त्यांची खराब रायडिंग गुणवत्ता, कमकुवत व दुर्दम्य पूल/कल्व्हर्ट, गजबजलेले शहर विभाग, खूप जास्त रेल्वे लेव्हल क्रॉसिंग, रस्त्याच्या कडेला असलेल्या सुविधांचा अभाव, कमकुवत रस्ते सुरक्षा उपाय इत्यादी इतर समस्या आहेत. सुमारे २० टक्के राष्ट्रीय महामार्गांचे एकेरी ते दुहेरी मार्गिका आणि ७० टक्के रस्त्यांचे दुहेरी मार्गिका, अशा प्रकारे रुंदीकरण करणे आवश्यक आहे. तसेच राष्ट्रीय महामार्गावरील निवडक कॉरिडॉरचे एक्स्प्रेस वेमध्ये रूपांतर करणे गरजेचे आहे.

आर्थिक प्रगतीचा वेग वाढवण्यासाठी पुरेशा रस्ते पायाभूत सुविधा निर्माण करणे हे एक कठीण काम आहे आणि त्यासाठी मोठ्या रकमेची आवश्यकता आहे. सध्याच्या अंदाजानुसार- चार मार्गिकांच्या महामार्गाची किंमत प्रतिकिलोमीटर अंदाजे ४.५ कोटी रुपये आहे आणि संरक्षित प्रवेश, सहा मार्गिकांच्या द्रुतगती मार्गाची किंमत अंदाजे ८.५ कोटी रुपये प्रतिकिलोमीटर आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी खासगी सहभाग, जागतिक बँक यांना प्रोत्साहन देऊन आणि इंधनावर उपकर लादून व्यवस्थापित केला जातो.

# अॅन्ड्रॉईड मोबाईल बीसी ही ग्रुपची सुरुवात करण्यात यावी.

सर्व साधारण माणसाजवळ मोठा मोबाईल असने फार जरूरी व अवश्यक झाले आहे कारण ती माणसाची मूलभूत अधुनिक गरज बनलेली आहे परंतु आज काल स्मार्ट फोन खरेदी करायला प्रत्येक व्यक्तीला एकदा एकदम रक्कम पैसे कधीच भेटत नसतात कारण मोठे कुटुंब किंवा गरीब वर्ग व सर्व सामान्यांची महागाई बेरोजगारीने आर्थिक परिस्थिती खूप वाईट खराब झालेली आहे. काहींना रोजगार असती तर काही बेरोजगारीत असतात म्हणून नागरिक मोबाईल खरेदी करण्यारिता फायनंन्स कंपनीकडे आपला प्रश्न सोडवायला जात असतात. आणि फायनंन्स कंपनी कडून नाईलाजाने मोबाईल कर्ज योजना द्वारे कर्ज घेऊन मासिक हप्तत्यावर मोबाईल खरेदी विक्री केली जाते. परंतु बाहका मार्फत अनेक कागदपत्रे मागवून डाऊन पेमेंट घेऊन मासिक हप्ते भरून मोबाईल खरेदी केली जात असते. मात्र जेव्हा मोबाईल खरेदी केला गेल्याने तेव्हा काही काळ समस्या सुटल्यासारखी वाटते परंतु अगर कर्ज फेड करते वेळी उशिर विलंब झाला की, हया मुदल फेडीच्या दंडाची रक्कम व्याजासह परत करावी लागते. म्हणजे मुद्दल व व्याज आणि दंड व्याज भरून त्या मोबाईलचे पैसे जास्त देवून आपल्याला पश्चाताप व आर्थिक पिळवणूकीच्या फसवणूकीची जाणीव होते. सर्व राज्यात सर्वाचा मूलभूत आर्थिक कठीण प्रश्न सोडविण्यास विशेष माहितीची मदत सेवा दिली जात आहे. प्रत्येक गाव शहरामध्ये व ग्रामिण भागातील गल्ली नगर चाळी मधील सर्वांना कर्ज व्याज आणि दंडाच्या रक्कमेपासून वाचायचे असेल तर फक्त विश्वासू खरे दहा किंवा बारा सदस्यांची निवड करण्यात येऊन स्त्री पुरुषास ग्रुप मध्ये एकत्र घेतले जाऊन सर्वांनी मोबाईल बीसी योजनेत सहभागी होण्याला सर्वाच्या सहमती मत मंजूरीने परवानगी घेतली जावी. केवळ दहा बारा सदस्यांनी एकत्र येऊन मोबाईल बीसौ ग्रुप सुरु करण्याची समान जबाबदारी घेण्यात यावी. यासाठी सर्वांनी सहभागी होऊन आपले अटी नियम लागू शती तयार करून स्विकारण्याचे ठरवावे. त्यासाठी नियमाप्रमाणे सामूहिक स्टॅम्प बॉड पेपर कार्यवाहीवरील सर्वानी नियमानुसार हमी पत्राची जिम्मेदारी घेण्यात यावी. यामुळे सर्वाच्या वागण्याला योग्य जबाबदार धरले जाईल. त्यामुळे सर्वाच्या मनातील गैरसमज निघून जाईल. मोबाईल खरेदी विषयी अनेकांची गंभीर समस्या निवारण होण्यास काळजी फिकर व सवय लावून घेतल्यास या जून्या पद्धतीचा अवलंब केल्याने ही हप्तेवारी बारा महिन्याची योजना नेहमी फायदेशिर व सफल राहणारी आहे. फक्त एकमेकांनी एक दुस–यावर विश्वास ठेवून वाढवून केवळ मोबाईल बीसी ड्रा ग्रुपचे अभियान मिशन पूर्ण होई पर्यंत सर्वांनी खरा व्यवहार करणे जरुरी राहून सर्वानी खरे बोलले तर सर्वाचा फायदा लाभ होणारा आहे. है लक्षात घ्यावे. ज्यांना समाज सेवा करण्याची आवड आहे असे व जे लोक गरजवंत आहेत असे आणि काही व्यापारी असतील तर ते लोक कामाला लागून कृतीशील सक्रीय राहतील. परंतु ज्यांची खरी चळवळ असून ज्यांना माणुसकीची खरी जाणीव तळमळ असणा–या आशा लोकांची इतर लोकांनी दिशाभूल करू नये कारण चांगले कुशल कर्म करणा–यांना नकारात्मक अडचणी सांगून मागी मध्ये आडथळा आणून त्यांचे मनोबल खच्चीकरण करण्याचे प्रयत्न सोडून देण्यास त्याग करावा. . अगर मेहनत प्रयत्न केले तर काहीच अशक्य नाही तसेच कंपनीकडून डिसकॉऊट सुट सवलत सुद्धा मिळवून घेता येऊ शकते. त्या पैशाची बचत तर होतेच पण या संधी सेवेचा सर्वाना समान लाभ मिळेल यात काहीच शंका घेण्यासारखे कारण नाही आहे. अगोदर तोंडी सर्वाना माहिती कळवून देण्यात यावी. नंतर अंमलबजावणी करण्याची खरी सुरुवात करावी, सर्वांचे एकत्रित पैसे गोळा करायला सार्वजनिक विचार करून व चर्चा संवादातून हिशेब लावून हप्ता ठरवून दहा बारा सदस्यांचे सामूहिक बैंक खाते खोलून सर्व मासिक हप्तत्याचे पैसे बँकेत जमा करून दर महिन्याला एक मोबाईल दुकानातून खरेदी केल्यामुळे वेळेवर बीसी ड्रॉ काढून देणे योग्य होत आहे. मोठा मोबाईल फोन खरेदी पासून वंचित राहणा–या अशा लोकांना एकमेकांच्या मदत सहाय्याने मोबाईल खरेदी करण्याकरिता एकमेकांनी मदत देण्याला व घेण्यास प्रयत्न चालू ठेवावेत.



ही योजना राबवून आआंमलात आणून सर्व समाजात सार्वजनिक व वैयक्तिक बदल परिवर्तन होऊन सर्व क्षेत्रात प्रगती विकास होण्याला काहीच वेळ लागणार नाही यातून आर्थिक रोजगार निर्माण करता येती आणि कोणतीही योजना राबविता येते. परंतु कोणाच्या कमजूरीचा गैरफायदा घेतला जाऊ नये याची खूप दक्षता घेवून सावधनता बाळगावी गाव शहरातील सभ्य नागरिक किंवा मित्र मंडळ, महिला मंडळ यांनी पुढाकार घेऊन अशा सर्व सामाजिक हिताचे कार्य हाती घेऊन वैयक्तिक व सार्वजनिक विकास घडवूण आणण्यास असे समाज कार्य सर्वाच्या निर्दशनास आणूण द्यावे, ईमानदारीने व्यवहार करायचा असेल तर सर्व प्रथम या संबंधित दर रोज वेळ देवून माहिती गोळा करून कंपनी यांच्याशी व्याज न भरता कर्जबाजारी न होता होलसेल दुकानदार एजन्सीला संपर्क साधून यांच्याकडून सुट सवलतीनुसार डौल प्रमाणे मोबाईल बीसी चालू केली तर आपले दैनंदिन कामे करून व्यवसाय चालू ठेवून रजिस्टर किंवा कार्ड तयार केल्यास नियमित सुरक्षित व्यवहार करता येऊ शकतो. जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन किंवा मोबाईल हाताळणा–या प्रशिक्षकाला फि देऊन गावात बोलावून मोठा मोबाईल हाताळायचे तंत्रज्ञान एकाने शिकून प्रशिक्षण घेऊन प्राप्त करून आत्मसात केल्यानंतर इतर ग्रुपच्या बाकीच्या सदस्यांना स्मार्ट फोन चालवायचे ज्ञान शिकवून पूर्ण माहिती द्यावी लागेल, हा सर्व खर्च ग्रुप मधून काढण्यात यावा. कारण मोबाईल चांगल्या प्रकारे हाताळला तर खूप वर्षे टीकेल. व आपल्या कुटूंबाला पण मदत होईल. ही संकल्पना व माहिती लेख लेखन करण्याचे मुख्य कारण असे आहे की सर्वाच्या आर्थिक परिस्थितीत आणि सामाजिक वातावणात मानसिक निराशा पसरलेली असल्याकारणाने आणि खोटया व्यवहाराने एक दुस–यांची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मोठया प्रमाणात पिळवणूक फसवणूक होत असल्याने सर्व हिताय सर्व मुखाय हीच बुद्ध शकवणूक लोकांपर्यंत पोहचण्यासाठी ही उपाय योजनाची खरी माहिती सांगून लेखन खुलासा उघड करून एका प्रचारका तर्फे बुद्ध तत्वज्ञान सर्वा पर्यंत नेण्याचा आणि प्रचारका मार्फत खरा प्रसार व सेवा कार्य करण्याचा नैतिक उद्देश व व्यवहारीक खरी भावना यशस्वी होवून लोकांपर्यंत पोहचविण्याकरिता हा प्रयत्न केला गेला जात आहे. जय भारता जय संविधान ।।जय भिमा!!! रमेश कांबळे रा. परतूर जि. जालना.

मो. नं. ८८०५५८२४८०,
९३७३१२५६७५

# ‘नव्या टास्क फोर्स’ला जुन्यांचे वावडे! मुंबईतून एकही डॉक्टर नाही

मुंबई: करोनाच्या पहिल्या लाटेचा सामाना करण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या तज्ज्ञांच्या समितीमधील एकाही डॉक्टरचा समावेश आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी जाहीर केलेल्या नव्या टास्क फोर्समध्ये नसल्यामुळे आरोग्यक्षेत्रात नाराजी व्यक्त केली जात आहे. ‘नवा विषाणू नवा टास्क फोर्स’ अशी टिप्पणी जुन्या टास्क फोर्समधील एका ज्येष्ठ डॉक्टरांनी केली आहे. गंभीर बाब म्हणजे या नव्या टास्क फोर्समध्ये मुंबईतील एकाही डॉक्टरचा समावेश करण्यात आलेला नाही.कोविड– १९ च्या पहिल्या लाटेदरम्यान वाढलेल्या रुग्णसंख्येवर नियंत्रण, त्यावर उपाययोजना करण्यासाठी १३ एप्रिल २०२० रोजी मुंबई महापालिकेच्या केईएम रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता डॉ संजय ओक यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ डॉक्टरांचे विशेष कृतिदलाची (टास्क फोर्स) निर्मिती करण्यात आली होती. तसेच राज्याच्या मुख्य सचिवांचे करोनाविषय प्रमुख सल्लागार म्हणून डॉ. सुभाष साळुंखे यांची नियुक्ती करण्यात आली होती. जुन्या टास्क फोर्समधील सर्वच तज्ज्ञांनी कोणतेही मानधन न घेता निरपेक्षपणे करोनाकाळात काम केले होते. यात सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील काही तज्ज्ञ होते. खाजगी रुग्णालयात संसर्गजन्य आजार तसेच मधुमेह तज्ज्ञ असलेले डॉ. राहुल पंडित व डॉ. शशांक जोशी यांचा समावेश होता. मुंबई महापालिकेची सर्व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांचे संचालक डॉ. अविनाश सुपे यांना करोनाकाळातील मृत्यूंचे विश्लेषण समितीचे अध्यक्ष करण्यात आले होते. आता नव्याने करोना रुग्णांची वाढ होऊ लागल्यानंतर तसेच जेएन.१ या नव्या उपप्रकाराचे रुग्ण सापडू लागल्यानंतर आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी नवीन टास्क फोर्सची घोषणा केली. या टास्क फोर्सच्या अध्यक्षस्थानी आयसीएमआर, दिल्लीचे माजी प्रमुख डॉ. रमण गंगाखेडकर आहेत. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिकच्या आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक डॉ म्हैसेकर, बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे येथील डॉ. सुरेश कार्यकर्ते, नवले मेडिकल कॉलेज, पुणे येथील डॉ. वर्षा पोतदार, नवले मेडिकल कॉलेज, पुणे येथील फिजिशियन डॉ. डी. बी. कदम सदस्य आहेत. यशिवाय आरोग्य विभागाचे आयुक्त सदस्य सचिव असणार आहेत. याबाबतचा शासन निर्णय जाहीर करण्यात आला असून गंभीर व अतिगंभीर आजारी कोविड–१९ रुग्णांसाठी रुग्ण व्यवस्थापन प्रोटोकॉल स्थापन करणे, कोविड–१९ क्रिटीकल केअर हॉस्पिटलमध्ये तज्ज्ञ डॉक्टर आणि आरोग्य सेवा सहायक कर्मचाऱ्यांच्या आवश्यकतेची शिफारस करणे, कोविड–१९ रुग्णांवर उपचार करताना एकसमानता राखण्यासाठी योग्य औषध प्रोटोकॉलची शिफारस करणे आदी जबाबदाऱ्या टास्क फोर्सकडे असल्याचे आरोग्यमंत्री तानाजी सावंत सांगितले.कमालीच्या प्रतिकूल परिस्थितीत तसेच संपूर्ण जगासाठी नवीन असलेल्या करोनाशी सामना करण्यासाठी जुन्या टास्क फोर्समधील डॉक्टरांनी प्रचंड मेहनत घेतली होती. करोनासाठीचे प्रोटोकॉल तयार करण्यापासून उपचाराची दिशा, रुग्णालयीन गरजा, आरोग्य विभाग तसेच महापालिका आणि खाजगी रुग्णालयांचा समन्वय साधून उपचार करण्यासाठी आवश्यक असलेल्या नियोजनात जुन्या टास्क फोर्समधील डॉक्टरांचा मोठा सहभाग होता. सार्सचा आजार असो की एच १,एन १ ची साथ असो संसर्गजन्य आजारविषयक डॉ. सुभाष साळुंके हे गेली तब्बल ४० वर्षे काम करत आहेत.

राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या प्रत्येक आरोग्य समितीमध्ये त्यांचा आवर्जून समावेश केला जातो व त्यांच्या अनुभवाचा फायदा घेतला जातो. अशा वळी नव्या टास्क फोर्समध्ये जुन्या टास्क फोर्समधील एकाही तज्ज्ञ डॉक्टरांचा समावेश करण्यात आला नसल्याबद्दल आरोग्य क्षेत्रात नाराजी दिसून येत आहे.

# दम्याच्या रुग्णांनी रोज करावे हे योगासन, श्वासोच्छवासाच्या समस्या होतील दूर



काही लोक दम्यासाठी घरगुती उपाय करून बघतात.हिवाळयात अनेकांना श्वास घेण्यास त्रास होतो. याचे एक प्रमुख कारण म्हणजे प्रदूषण, ज्यामुळे आपल्या फुफ्फुसांना सूज येते आणि श्वास घेण्यास त्रास होतो. या सर्व समस्यांवर आम्ही तुम्हाला एक रामबाण उपाय सांगणार आहोत, ज्याचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत. तसेच दिवसातून फक्त १५ मिनिटे हा उपाय केल्याने तुम्हाला आराम मिळेल आणि तो उपाय म्हणजे योग.हस्त उत्तानासन योग चटईवर प्रणामासन म्हणजे प्रार्थनेला जसे बसतो तसे बसा. दीर्घ श्वास घेत दोन्ही हात डोक्याच्या वर घ्या. दोन हातांमधील अंतर खांद्याच्या रुंदीपेक्षा जास्त नसावे. वरचे धड आणि डोके मागे वळवून थोडेसे वक्र करा. हात वर करणे आणि धड मागे वळवणे एकाच वेळी होईल.भुजंगासन भुजंगासन दम्याच्या रुग्णांसाठी खूप चांगले आहे. या योगासनामुळे छातीतील श्वासोच्छवासाचा त्रास दूर होतो. यामुळे रक्ताभिसरण सुरळीत होण्यास मदत होते.उस्त्रासन करण्यासाठी सर्वप्रथम गुडघ्यावर बसावे लागते. त्यानंतर दोन्ही गुडघ्यांची रुंदी खांद्याएवढी ठेवा आणि तळवे पूर्णपणे पसरवा. पाठीचा कणा किंचित मागे वाकवा आणि दोन्ही हातांनी टाचांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करा. विरभद्रासन विरभद्रासनाला वॉरियर पोझ असेही म्हणतात. हे आसन करण्यासाठी उभे राहून पाठ सरळ करा. यानंतर, एक पाय पुढे पसरवा आणि तो वाकवा, तर मागचा पाय सरळ राहील. त्यानंतर दोन्ही हात खांद्यापर्यंत वर करून सरळ करा. नंतर हळूहळू श्वास घ्या.

# वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजना समिती गठीत, आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नुतन समिती सदस्यांचा सत्कार

लातूर दि.२८ :– राजश्री शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजनेची लातूर जिल्हा समिती फुलचंद अंधारे यांच्या अध्यक्षतेत १२ जणांची शासनाने समिती गठित केली असून या समितीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा भाजपाचे नेते आ. रमेश आप्पा कराड यांनी सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

साहित्य आणि विविध कलेच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम करणाऱ्या वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना शासनाच्या वतीने राजश्री शाहू महाराज वृद्ध साहित्यिक व कलावंत मानधन योजना राबवली जात आहे. या योजनेसाठी योग्य लाभार्थ्यांची निवड व्हावी, त्यांना मानधन मिळावे यासाठी जिल्हास्तरावर शासनाच्या वतीने समिती गठित केली जाते.



भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. गिरीश महाजन यांनी फुलचंद अंधारे यांच्या अध्यक्षते खालील १२ जणांची समिती गठित केली असून समितीच्या सर्व सदस्यांना जिल्हा परिषदेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव डी.जे. तडवी यांनी २८ डिसेंबर २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार नियुक्ती आदेश दिले आहेत. या समितीत अध्यक्ष फुलचंद उत्तमराव अंधारे, उपाध्यक्ष ज्ञानोबा गणपतराव भिसे, सदस्य मोहन काशीराम साळुंखे, किशन आप्पाराव घोगरे, डॉ. संदीपान जगदाळे, प्रा. शशिकांत देशमुख, नरसिंग नारायण ढवळे, बालाजी गाडेकर, बळीराम महाराज नागरगोजे, अंकुश किशनराव दहिफळे, कुमार विठ्ठलराव पाटील, वीरनाथ ज्ञानेश्वर लड्डा महाराज यांचा समावेश आहे.

सदरील समितीच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्यांचा भाजपाचे नेते आ. रमेश आप्पा कराड यांनी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे अनिल भिसे, दशरथ सरवदे, बन्सी भिसे, सतीश आंबेकर, अमर चव्हाण, भागवत गीते, गोपाळ शेंडगे, गंगासिंह कदम, माधव घुले, संपत कराड, संजय डोंगरे, शेख निजाम, महादेव जाधव लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेड वाईन प्यायल्याने खरंच हृदयविकाराचा धोका कमी होतो? आरोग्याला फायदे होतात? डॉक्टर काय सांगतात पाहा



आजकाल अनेक जण वाईन पिण्याचे शौकीन असल्याचं दिसून येतं. पण हे पेय प्यायल्याने हृदयविकाराचा धोका कमी होऊ शकतो काय, डॉक्टर काय सांगतात, जाणून घेऊया आजकाल अनेक जण वाईन पिण्याचे शौकीन असल्याचं दिसून येतं. लाल रंगाचं हे पेय अनेक जणांच्या पसंतीस उतरलेलं आहे. अनेक लोकांना रेड वाईन पिणे अतिशय आवडते. कुठलेही सेलिब्रेशन करायचे असेल तर अगदी आवडीने लोकं वाईन पितात. किंबहुना ते आजच्या काळातील पेय बनले आहे. गेल्या काही वर्षांपासून वाईन ही आरोग्यासाठी चांगली असते, अशी समज सर्वमान्य झाल्याचं पाहायला मिळतं. त्यातही विशेषतः रेड वाईन. याचा संबंध दीर्घायुष्य आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्याशी जोडला जातो. पण, खरंच रेड वाईन आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे का? रेड वाईन प्यायल्याने हृदयविकाराचा धोका कमी होतो का, याच विषयावर अपोलो हॉस्पिटल्सच्या मुख्य पोषणतज्ज्ञ डॉ. प्रियंका रोहतगी यांनी माहिती दिली असल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. त्यासंबंधी सविस्तर माहिती जाणून घेऊ.

# प्रत्येकाने ग्राहक संरक्षण कायदा जाणून घेण्याची गरज – अमोल गिराम राष्ट्रीय ग्राहक दिन कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर, दि. २८ (जिमाका): प्रत्येक व्यक्ती हा जन्मापासून ते मृत्युपर्यंत ग्राहक असतो. त्यामुळे त्याला ग्राहक म्हणून आपल्याला मिळालेल्या हक्कांची माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येकाने ग्राहक संरक्षण कायदा जाणून घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष अमोल गिराम यांनी आज येथे केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी विजयकुमार ढगे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचच्या सदस्य रेखा जाधव, रवींद्र राठोडकर, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील, ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रल्हाद तिवारी, प्रांत ग्राहक संरक्षणचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश भोसले, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्य गीता मोरे, रंजना मालुसरे, शिवशंकर रायवाडे, निपुण शेंडगे, सतीश देशमुख, तहसीलदार सौदागर तांदळे, विधिज्ञ एस. व्ही. तापडिया, आसिफ पटेल यावेळी उपस्थित होते. ग्राहक संरक्षण कायदा हा व्यापक सामाजिक दृष्टीकोनातून बनविण्यात आलेला कायदा आहे. या कायद्यांतर्गत जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाकडे दाखल प्रकरणात तक्रारदाराला स्वतः आपली बाजू मांडण्याची संधी मिळते. या कायद्याची प्रक्रिया अतिशय



सहज, सोपी असून प्रत्येक ग्राहकाने हा कायदा समजून घ्यावा. या कायद्याचे ज्ञान मिळाल्यास फसवणुकीच्या विरोधात आवाज उठविणे शक्य होणार आहे. त्यामुळे हा कायदा समाजातील तळागाळातील व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनीच पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे श्री. गिराम यावेळी म्हणाले. तसेच आता ई–कॉमर्स, ई–ट्रेडिंगमध्ये होणाऱ्या फसवणुकी विरुद्धही ग्राहक या कायद्यांतर्गत दाद मागू शकतो. या कायद्यांतर्गत अतिशय जलद न्याय मिळतो, असे त्यांनी सांगितले. ग्राहक संरक्षण कायद्यामुळे ग्राहकांना अनेक हक्क प्राप्त झाले असून या हक्कांबाबत जनजागृती करण्यासाठी राष्ट्रीय ग्राहक दिन दरवर्षी साजरा करण्यात येत असल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती आयरे यांनी प्रास्ताविकात सांगितले. अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय मिरकले पाटील, ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रल्हाद तिवारी, प्रांत ग्राहक संरक्षणचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश भोसले, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्य रंजना मालुसरे यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच विधिज्ञ श्री. तापडिया, श्री. पटेल यांनी ग्राहक संरक्षण अधिनियमाबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. प्रारंभी फीत कापून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त विविध शासकीय विभागांमार्फत योजनांची माहिती देण्यासाठी लावण्यात आलेल्या स्टॉलची मान्यवरांनी पाहणी केली. लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पंडित कांबळे यांना देवकाई राज्यस्तरीय काव्य पुरस्कार प्रदान




धाराशिव : प्रकाश बनसोड यांच्या आई स्मृतीशेष देवकाबाई बापुरावजी बनसोड यांच्या चतुर्थ स्मृतिदिनानिमित्त देवकाई राज्यस्तरीय काव्य पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २४ डिसेंबर २०२३ रोजी न्यू रोशन सेलिब्रेशन हॉल, आर्वी, जिल्हा वर्धा येथे घेण्यात आला. या पुरस्काराचे संयोजक प्रकाश बनसोड हे फक्त कवितासंग्रहासाठी पुरस्कार देतात. देवकाई राज्यस्तरीय काव्य पुरस्कारासाठी प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ दोन पुरस्कार दिले जातात. त्यातील पंडित कांबळे यांच्या पेटलेल्या शहराच्या कल्लोळात या कवितासंग्रहाला द्वितीय पुरस्कार मिळाला आहे. माजी आमदार अमर भाऊ काळे, गझलकार संजय इंगळे, प्रा. मनोहर नाईक, विद्यानंद हाडके, प्रफुल भुजाडे, संयोजक प्रकाश बनसोड यांच्या हस्ते पंडित कांबळे व लीना कांबळे यांचा सपत्निक शाल ,स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र व बुके देऊन पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बाळाभाऊ जगताप, प्रा. पंकज वाघमारे, प्रा. प्रशांत धनवीज, प्रशांत ढोले, प्रीती वाडीभस्मे हे उपस्थित होते.

पंडित कांबळे हे नगर परिषद शाळा क्रमांक १४ धाराशिव येथे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून काम करतात. त्यांचे संदर्भ,चरथ भिक्खवे,आणि पेटलेल्या शहराच्या कल्लोळात हे तीन कविता संग्रह, तसेच उजेडाचा वारस: यु.डी.गायकवाड गौरव ग्रंथ, उस्मानाबाद जिल्ह्यातील आंबेडकरवादी साहित्यिक , साहित्यिक प्रवृत्ती: मूल्ये आणि जाणीवा,दत्तांकुर यांची निवडक कविता, हे चार संपादित पुस्तके. नाचा रे नाचा,गाणी माझ्या गावची, विहार गाणी हे तीन बालकवितासंग्रह,डॉ. बाबुराव गायकवाड यांचे साहित्य आशय आणि विश्लेषण हे समीक्षेचे पुस्तक प्रकाशित आहे. असे एकूण आकरा पुस्तके त्यांची प्रकाशित झालेली आहेत .पंडित कांबळे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अनेक साहित्यिक, मित्र , नातेवाईक यांनी अभिनंदन केले आहे.

# वर्ष झाले उद्घाटन होऊन; घोटी ते सिंदगी-मोहपुर रस्ता दुरुस्तीच्या प्रतीक्षेत.!



किनवट / शेख शौकत : - लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या ७३ व्या जयंतीनिमित्त दि. १२/१२/२०२२ रोजी किनवट माहूर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांनी लोकनेते मुंडे साहेबांच्या जयंतीनिमित्त संपूर्ण किनवट तालुक्यात महाराष्ट्र शासनाकडून भरीव नीधी खेचून आणत ७३ व्यां जयंती निमित्त मोठ्या थाटात ७३ कोटी रुपये च्या कामाचे उद्घाटन केले. याचाच एक भाग म्हणून घोटी ते सिंदगी मोहपुर या दोन कोटी पन्नास लाख रुपये च्या रस्ता दुरुस्ती कामाचे उद्घाटन अंबाडी फाटा येथे घोटी ते सिंदगी मोहपुर रस्ता दुरुस्ती किंमत दोन कोटी पन्नास लाख रुपये असा कामाचा उल्लेख असलेल्या फलकाचे फित कापून उद्घाटन केले. पण लोकनेते मुंडे साहेबाची ७४ वी जयंती झाली म्हणजेच एक वर्ष होऊन सुद्धा सार्वजनिक बांधकाम विभाग च्या कृपेने खूप वर्षांपूर्वी डांबरीकरण झालेला रस्ता दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे. आणखी त्यात हलगर्जीपणाचा कळस म्हणजे उद्घाटन प्रसंगी लावलेला कामाची माहिती दर्शवणारा फलक सुद्धा गायब आहे. फुलसावंगी ला जोडणारा मुख्य रस्ता असेलेला घोटी ते सिंदगी मोहपुर रस्ता तात्काळ दुरुस्त करणे गरजेचे असून अंबाडी फाटा ते मलकापूर सदर रस्ता अनेक वर्षापासून दुरुस्त झाला नसल्यामुळे रस्त्यात मोठमोठे खड्डे पडल्याने रस्त्याने दुचाकी चार चाकी वाहने चालवणे कठीण होऊन बसले आहे. घोटी ते मलकापूर खेरडा पर्यंत तर या रस्त्याची अतिशय बिकट अवस्था आहे. उद्घाटन झाल्यानंतर हा रस्ता लगेच होईल अशी या परिसरातील नागरिकांच्या अपेक्षा होती पण एक वर्षे उलटले तरी रस्ता जैसे थे स्थितत असून रस्त्याची अवस्था अधिकच खराब झाली आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अभियंत्यांना विचारणा केली असता उडवा उडवी चे उत्तर देत टाईम काढून नेत आहेत. किनवट माहूर तालुक्यातील रस्ते विकासासाठी आमदार भीमराव केराम भरीव निधी खेचून आणत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाला सदर रस्ता दुरुस्त करण्यात उदासीनता का? असा प्रश्न सर्वसामान्य विकास प्रेमी जनतेला पडला असून आमदार भीमराव केरांम यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला सूचना देऊन सदर रस्ता तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी सुजान नागरिकातून होत आहे.

# विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण संस्काराबरोबरच माणूसकी जपण्याचे काम करावे- ओमप्रकाश शास्त्री

लातूर -स्पर्धेच्या युगामध्ये शालेय विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण देणे गरजेचे आहे. या शिक्षणातून माणसाने माणसांसोबत माणसासारखे वागून माणूसकी जोपासण्याचे काम करावे. या बरोबरच दैनंदिन दिनचर्येमध्ये शालेश विद्यार्थ्यांनी शिक्षण संस्काराबरोबरच माणूसकी जपण्याचे काम सदैव करावे असे प्रतिपादन आर्य समाजाचे आचार्य पंडीत ओमप्रकाश शास्त्री यांनी केले.

यावेळी ते जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद इंटिग्रेशन इंग्लिश स्कूल, लातूर येथे आयोजित मानवता संस्कार व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. प्रतिभाताई पाटील कव्हेकर या उपस्थित होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून आर्य समाज पश्चिम विभाग न्याय लातूरचे अध्यक्ष एस.आर.मोरे, जेएसपीएमचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, प्रतापसिंह चव्हाण, राजेंद्र दिवे, अक्षय शास्त्री, प्राचार्य विकास लबडे, प्राचार्य गोविंद शिंदे, अकॅडमीक इन्चार्ज संजय बिराजदार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना ओमप्रकाश शास्त्री म्हणाले, शालेय विद्यार्थ्यांसाठी संबोधन व उद्बोधनाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात घेतले जातात. परंतु या शिक्षणातून उच्च शिक्षीत होऊन पदवी घेण्यापेक्षा त्याच्यामध्ये संस्काराची पेरणी करणे गरजेचे आहे. या संस्कारातून माणूस प्रगल्भ होतो आणि भावी पिढीला आपल्या कार्यातून दिशा देण्याचे कार्य करतो. त्यामुळे संस्काराची जपवणूक करा असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी जेएसपीएम संचलित स्वामी विवेकानंद इंटिग्रेशन इंग्लिश स्कूलच्यावतीने प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. तसेच राष्ट्रभक्त स्वामी विवेकानंद व भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य तथा डायरेक्टर गोविंद शिंदे यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार अकॅडमीक इन्चार्ज संजय बिराजदार यांनी केले. यावेळी या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचार्यांसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**संस्कारामुळे यशस्वी पिढी घडेल - सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर**

जेएसपीएम संचलित ३७ युनिटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अध्यात्म, विज्ञान व व्यावसायिकतेवर आधारित शिक्षणाद्वारे तेजस्वी तरूण घडविणारे शिक्षण देण्याचे काम आपण गेल्या अनेक वर्षापासून करीत आहोत. शिक्षणाबरोबर संस्कार देखील तेवढेच महत्त्वाचे आहेत. शिक्षण घेऊन माणूस सुसंस्कृत होतो. परंतु शिक्षणाला संस्काराची जोड दिल्यास त्या संस्कारातून यशस्वी पिढी घडेल असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा तथा जेएसपीएम संस्थेच्या सचिव सौ. प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

# महिलांची प्रगतीवरून समाजाच्या उन्नतीचा आलेख ठरवला जातो - मनिषाताई आंबेडकर

मुंबई दि. २८ :- पिढ्यानपिढ्या महिलांवर अत्याचार होत आले आहेत, आजमितीस स्वतंत्र मिळून ७६ वर्षे झाली तरी महिला अजूनही सुरक्षित नाहीत, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अनेक प्रसंगांना तोंड देत मोठी क्रांती केली म्हणून आजच्या महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून यशाची शिखरे पादाक्रांत करताना दिसत आहेत; विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या दिलेल्या शिकवणीमुळेच आज समाजात परिवर्तन होताना दिसत आहे, महिलांनी स्वतःची सक्षमता, पात्रता, क्षमता सिद्ध केली नाही असं कोणतेही क्षेत्र आता शिल्लक राहील नाही, म्हणूनच आता महिलांची प्रगतीवरून समाजाच्या उन्नतीचा आलेख ठरवला जातो हे उल्लेखनीय आहे. असे प्रतिपादन मा. मनिषाताई आंबेडकर यांनी पदवीधर विद्यार्थिनींच्या सत्कार समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संबोधित करताना केले. सत्यमेव जयते संघ परिवार, ता. महाड, पोलादपूर, जिल्हा रायगड, रत्नागिरी या संस्थेच्या विद्यमाने पदवीधर विद्यार्थिनींचा सत्कार समारंभ बौद्धजन पंचायत समितीचे चिटणीस मा. भगवान तांबे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, भोईवाडा, परेल, मुंबई - १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदर प्रसंगी विवाह मंडळ अध्यक्ष तुकाराम घाडगे यांनी आपल्या लाघवी शैलीत सूत्रसंचालनाची धुरा यशस्वीपणे पेलवली तसेच गजानन तांबे यांनी प्रास्ताविक मांडत असता संस्थेचे संस्थापक निलेश साळवी यांनी कश्या प्रकारे अनेक दुःखाचे चटके सहन करीत संघटनेची बांधणी केली याची माहिती देत, एक पुरुष शिकला तर तो एकालाच शिकवतो परंतु एक महिला शिकली तर ती साऱ्या कुटुंबाला शिकवते व त्यातूनच समाजाची प्रगती होते असा मानस असलेला जेमतेम आठ हजारचा पगारदार व्यक्ती बौद्धिक पातळीवर किती प्रगल्भ आहे

याची प्रचिती त्यांनी सभागृहास याची देही याची डोळा करून दिली, त्यातूनच सत्यमेव जयते संस्थेची रोवलेली मुहूर्तमेढ व पदवीधर विध्यार्थीनींच्या सत्कार समारंभ कार्यक्रमाची आखलेली संकल्पना ही त्यांनी प्रस्ताविकेतुन सभागृहासमोर सादर केली, सन २०१६ पासून आजमितीस जवळपास एकशे सोळा महिलांचा सत्कार करण्यात आला आहे हे ही त्यांनी प्रास्ताविकेत नमूद केले. सदर प्रसंगी बौद्धजन पंचायत समितीचे उपसभापती विनोद मोरे, उपकार्याध्यक्ष मनोहर मोरे, अशोक कांबळे (कणगोळकर), सरचिटणीस राजेश घाडगे, सचिव रवींद्र शिंदे, समाजसेवक पांडुरंग साळवी, तालुका प्रतिनिधी राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, चंद्रमनी तांबे, गतप्रतिनिधी भगवान तांबे, महाड, पोलादपूर सेवा संघाचे अध्यक्ष पवार आदी मान्यवर सदर कार्यक्रमास उपस्थित होते त्यांनी पदवीधर विध्यार्थीनींना सध्याच्या स्पर्धेच्या युगात कसे टिकून रहावे यावर मौलिक असे मार्गदर्शन केले; तसेच अनेक विद्यार्थ्यांनींनी ही आपले मत व्यक्त करत संस्थेचे आभार मानले. अध्यक्षीय भाषणात भगवान तांबे यांनी आम्ही बीजरुपात रुजवलेल्या संस्थेचे आजचे वटवृक्षात झालेले रूपांतर बघताना खरे तर आम्हीच थक्क होतो, आज त्याची पाळंमुळं महाड, पोलादपूर याच भागात सीमित न राहता ती थेट रत्नागिरी, विदर्भात पसरली आहेत हा प्रवास सुलभ नसला तरी नक्कीच सुखावून जाणारा आहे, शहर ते ग्रामीण अश्या सर्वच स्तरातून विद्यार्थीनींनी संस्थेच्या उपक्रमात सहभाग घेतला आजमितीस एकशे सोळा मुली आजवर सन्मानित झाल्या यापुढे ही होत राहतील, तसेच संस्थापक निलेश साळवी व आम्हा सर्वांचे स्वप्न होते की शंभरी ओलांडल्यावर पुढील काही सत्कार आंबेडकरी घराण्यातील व्यक्तीच्या शुभहस्ते झाला पाहिजे आणि आज आमचे स्वप्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नातसून मा. मनिषाताई आंबेडकर यांच्या रूपाने सत्यात उतरत आहे हे आम्ही आमचे भाग्य समजतो तसेच पदवीधर विद्यार्थीनींच्या सत्कार समारंभाची परंपरा आम्ही टिकवून ठेवण्यास कटिबद्ध राहू, आजवर कोणत्याही राजकीय पुढारी, व्यावसायिक, दानवीर यांच्याकडून डोनेशन न घेता सभासदांनी आपापसात जमेल ती वर्गणी गोळा करून स्वखर्चातून हा कार्यक्रम राबविण्यात येतो आणि यापुढे ही राबविण्यात येईल असे प्रतिपादन केले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानून तुकाराम घाडगे यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# परीक्षेच्या यशस्वी अंमलबजावणीत मुख्याध्यापक आणि केंद्र संचालक यांची भूमिका महत्त्वाची ज्येष्ठ संचालक ॲड. श्रीकांत अप्पा उटगे



लातूर दि. २८ :- विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये प्रत्येक परीक्षा अत्यंत महत्त्वाची असते त्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेलातर अनन्यसाधारण महत्त्व असते. या परीक्षेच्या यशस्वी अंमलबजावणीमध्ये प्रत्येक शाळा व महाविद्यालयातील प्राचार्य, मुख्याध्यापक, केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक यांची महत्त्वाची भूमिका असल्याचे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे जेष्ठ संचालक ॲड. श्रीकांत अप्पा उटगे यांनी अध्यक्षीय समारोप करताना प्रतिपादन केले. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ लातूर, विभागीय मंडळ, लातूर आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात प्राचार्य, मुख्याध्यापक आणि केंद्र संचालक यांची संयुक्त सभा संपन्न झाली. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लातूर विभागीय मंडळाचे सहाय्यक संचालक अंकुश कुंभार, पर्यवेक्षक एस.एल.राठोड, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, कार्यालयीन प्रमुख नामदेव बेंदरगे आणि मंडळ कनिष्ठ लिपिक एस.एम.येवते यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वरांना सर्व मान्यवरांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी विभागीय मंडळाचे एस.एल. राठोड म्हणाले की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४च्या बोर्ड परीक्षेमध्ये अमुलाग्र बदल करण्यात आलेला आहे. हा बदल समजून घेऊन विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने आपण अधिकाधिक काळजीपूर्वक शैक्षणिक कार्य केले पाहिजे. तसेच त्यांनी उपस्थित मान्यवर प्रतिनिधींचे बोर्ड परीक्षेच्या संदर्भात येणाऱ्या शंका आणि समस्यांचे निराकरण केले. यावेळी विभागीय मंडळाचे सहाय्यक सचिव अंकुश कुंभार, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनीही परीक्षेसंबंधी मौलिक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांनी केले. प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. संजय पवार यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.परमेश्वर पाटील, राम पाटील, गोपाळ तिरमले, शुभम बिराजदार, शिवशंकर स्वामी, बालाजी डावकरे, बालाजी होनराव, संतोष येंचवाड, रमेश राठोड, संजय गिरी, संदीप मोरे आणि भीमाशंकर सुगरे यांनी परिश्रम घेतले. या संयुक्त सभेला लातूर जिल्ह्यातील महाविद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय व विद्यालयातील प्राचार्य, मुख्याध्यापक, उपप्राचार्य, केंद्र संचालक आणि पर्यवेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीतांनी कार्यक्रमाची सांगता झाली.

# मंचर पोलीस ठाणे विरुद्ध वंचित बहुजन आघाडीचा जन आक्रोश आंदोलन होणार..!!




पुणे :- पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यामधील लांडेवाडी या गावांमधील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रसुती दरम्यान डॉक्टरांच्या व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे लांडेवाडी गावचे पीडित कुटुंब शिवाजी दादू लवांडे यांची मुलगी अश्विनी बाळू केसकर यांचा बाळंतपणाच्या वेळी तीन तास रुग्णालय मध्ये गैरहजर असल्याने डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तडफडून मृत्यू झाला डॉक्टर नर्स आणि स्टाफ यांच्यावर गुन्हा दाखल करा अशी मागणी वंचित बहुजन आघाडी चे राजकुमार यशवंत (पुणे जिल्हा अध्यक्ष) व सुरेशजी मोहिते साहेब (वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे - महाराष्ट्र सरचिटणीस) यांच्या आदेशानुसार पंकज भाऊ सरोदे (आंबेगाव तालुका उपाध्यक्ष)यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले होते. मंचर पोलीस ठाणे यांनी खोटे आश्वासन देऊन पीडित कुटुंबाची दिशाभूल करून तीन महिने होऊन गेले परंतु कोणतीही कारवाई झाली नाही व कारवाई न झाल्याने लवांडे परिवार यांच्या मृत्यू पावलेल्या मुलीला न्याय मिळत नाही म्हणून मानसिकता बिकट झाली आहे अशा मानसिकता मध्ये लवांडे परिवारातील कोणत्याही व्यक्तीने जीवाचं बरं वाईट केलं तर याच्या जबाबदार कोण ??... लवकरात लवकर गुन्हेगारांवर गुन्हा दाखल करा अन्यथा बुधवार १७/०१/२०२४ रोजी सकाळी ११:०० वा. मंचर पोलीस ठाणे विरुद्ध जन आक्रोश आंदोलन घेणार आहोत आपलं सहकार्य असावा. असे निवेदन मंचर पोलीस ठाणे,डी.वाय.एस.पी खेड, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, व जिल्हा विशेष अधिकारी पुणे. यांना निवेदन देऊन पुणे कार्यालयतील पी.आर.ओ यांच्याशी प्रदीप गौतम साळवे (वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे निरीक्षक) व पंकज सरोदे (आंबेगाव तालुका उपाध्यक्ष) यांनी संपूर्ण माहिती देऊन योग्य ती चर्चा करण्यात आली व मंचर पोलीस ठाण्याचे बीट आमदार आढरी यांनी पीडित कुटुंब आशुतोष लवांडे यांना फोन करून धमकी देण्यात आली की प्रदीप गौतम साळवे यांनी सोशल मीडियावर कोणत्याही गोष्टीचा उल्लेख केला तर यांना सायबर क्राईम खढ च्या अंतर्गत अटक करण्यात येईल, परंतु आपले व्यक्तिगत मत मांडणे हे संविधानाने दिलेले अधिकार आहेत आणि अशा धमक्यांना आम्ही घाबरत नाही, कारण मंचर पोलीस ठाण्यातून पीडित कुटुंबांना हाकलून लावलं जातं आणि मांडगे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक) यांच्या विरोधात बोललं तर अटक करण्यात येईल परंतु ६ महिने होऊन गेले अश्विनी बाळू केसरकर यांचे डॉक्टर आणि नर्स यांच्या हलगर्जीपणामुळे ३ तास तडफडून मृत्यू मृत्यू पावले अशा गुन्हेगारांवर अटक करणे अशक्य ठरते.असे वक्त प्रदीप गौतम साळवे यांनी केले. मंचर पोलीस ठाणे इथे निवेदन देण्यास उपस्थित असलेले : पंकज भाऊ सरोदे (आंबेगाव तालुका उपाध्यक्ष)दिपालीताई साबळे यांची वंचित बहुजन महिला आघाडी आंबेगाव (तालुका अध्यक्ष), संगीता ताई मिरके (आंबेगाव तालुका उपाध्यक्ष), साधू शेठ लवांडे (तालुका प्रमुख सल्लागार), सुरेश दादा रोकडे (तालुका उपाध्यक्ष), रतन साबळे (सदस्य) संदीप मिरके (सदस्य), प्रदीप गौतम साळवे (वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियन)

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE